**Maharashtra State Board of**
**Secondary & Higher Secondary Education, Pune**
S.R.No.832-A, Final Pl No. 178,179, Near Balchitrawani, Behir Agharkar Research Institute, Bhamburda, Shivajinagar, Pune-411004.

**महाराष्ट्र राज्य**
**माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे**
स.न.८३२-ए, फा.प्लॉ.नं.१७८,१७९,बालचित्रवाणी शेजारी, आघारकर
रिसर्च इन्स्टिटयूटच्या मागे, भांबुर्डा, शिवाजीनगर, पुणे ४११००४

Email : secretary@msbshse.ac.in Telegram : MAHABOSEC, PUNE.
Tel : Chairman (P) : STD . (020)-25651751 । EPABX -25705000 Fax : 25665807 । Secretary(P) : 25651750

जा. क्र. रा.मं./परीक्षा-८/ ९४८५
दिनांक - १५/०३/२०२२

प्रति,

१) मा. महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई-४०००३२
२) मा. विभागीय प्रसिध्दी उपसंचालक,पुणे/नागपूर/औरंगाबाद/मुंबई/कोल्हापूर/अमरावती/नाशिक/लातूर/कोकण
३) मा. संचालक,दूरदर्शन केंद्र,वरळी,मुंबई-४०००३०
४) मा. संचालक,आकाशवाणी,मुंबई केंद्र, नवीन प्रसारण भवन, बॅकबे रेक्लेमेशन, आमदार निवासाजवळ, मुंबई-४०००२०
५) मा. संचालक,आकाशवाणी केंद्र
पुणे/नागपूर/औरंगाबाद/मुंबई/जळगांव/रत्नागिरी/सांगली/कोल्हापूर/सातारा/सोलापूर/नाशिक
६) सर्व जिल्हा प्रसिध्दी अधिकारी
७) मा. संपादक, सर्व वृत्तपत्र/ वृत्तवाहिन्या

विषय :- मार्च-एप्रिल २०२२ उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. १२ वी) व माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ. १० वी) परीक्षेसाठी परीक्षा दालनात विलंबाने येणा-या परीक्षार्थ्यांना प्रवेश नाकारणेबाबत

**महोदय,**

मार्च-एप्रिल २०२२ उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. १२ वी) व माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ. १० वी) परीक्षेसाठी परीक्षा दालनात विलंबाने येणा-या परीक्षार्थ्यांना प्रवेश नाकारणेबाबत प्रकटन या पत्रासोबत जोडलेले आहे. सदर प्रकटनास आपल्या कार्यकक्षेतील वृत्तपत्र, वत्तवाहिन्या, आकाशवाणी व दूरदर्शन केंद्रांनी त्यांच्या वृत्तपत्रात प्रादेशिक बातम्यांचे वेळी विनामूल्य प्रसिध्दी देण्याची व्यवस्था करावी, ही विनंती.

(डॉ. अशोक भोसले)
सचिव,
राज्य मंडळ, पुणे ४.

**प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी :-**

१) विभागीय सचिव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
पुणे/नागपूर/औरंगाबाद/मुंबई/कोल्हापूर/अमरावती/नाशिक/लातूर/कोकण विभागीय मंडळ,
पुणे/नागपूर/औरंगाबाद/मुंबई/कोल्हापूर/अमरावती/नाशिक/लातूर/कोकण त्यांनी स्थानिक स्थरावर प्रकटन प्रसिध्द करावे. व सर्व मान्यताप्राप्त उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयाच्या निदर्शनास आणावे.
२) व्यवस्थापक, गणकयंत्र विभाग, राज्य मंडळ,पुणे ३) अस्वीस, सस्वीस, राज्यमंडळ, पुणे ४) ऑनलाईन विभाग

**प्रत माहितीसाठी सविनय सादर-**

१) मा. प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग , मंत्रालय, मुंबई - ४०००३२
२) मा. खाजगी सचिव, मा. मंत्री, शालेय शिक्षण विभाग. मंत्रालय, मुंबई - ४०००३२
३) मा. खाजगी सचिव, मा. राज्यमंत्री, शालेय शिक्षण विभाग. मंत्रालय, मुंबई - ४०००३२
४) मा. अवर सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग , मंत्रालय, मुंबई - ४०००३२
५) मा. आयुक्त शिक्षण, शिक्षण आयुक्त कार्यालय, पुणे - ४११००१

# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे ४११ ००४.

॥ प्र क ट न ॥

विषय : मार्च-एप्रिल २०२२ उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. १२ वी) व माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ. १० वी) परीक्षेसाठी परीक्षा दालनात विलंबाने येणा-या परीक्षार्थ्यांना प्रवेश नाकारणेबाबत

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे घेण्यात येणारी उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) ची लेखी परीक्षा दि. ०४/०३/२०२२ ते दि. ०७/०४/२०२२ व माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.१०वी) ची लेखी परीक्षा दि. १५/०३/२०२२ ते दि. ०४/०४/२०२२ या कालावधीत आयोजित करण्यात आली आहे.

लेखी परीक्षेसाठी विहीत वेळेपेक्षा (सकाळ सत्रात १०.३० वा. व दुपार सत्रात ३.०० वा.) उशिराने येणा-या विद्यार्थ्यांबाबत पुढीलप्रमाणे कार्यपध्दती होती. उत्तरपत्रिका लेखन प्रत्यक्ष सुरू झाल्यानंतर विद्यार्थ्यांना परीक्षागृहात प्रवेश देण्याची सुविधा उपलब्ध नाही. मात्र अपवादात्मक परिस्थितीत सदर वेळेनंतर १० मिनिटे उशिरा येणा-या परीक्षार्थ्यांना विलंबाच्या कारणाची खातरजमा करून केंद्रसंचालक स्तरावर परवानगी देण्यात येत होती. उपरोक्त १० मिनिटांनंतर अतिशय अपवादात्मक परिस्थितीत विद्यार्थी परीक्षेस प्रविष्ठ होण्यास केंद्रावर आल्यास व त्यामागचे कारण केंद्रसंचालकांना रास्त वाटल्यास त्यांनी विभागीय अध्यक्ष/विभागीय सचिव यांची दूरध्वनीवरून पूर्वमान्यता घेवून आणखी १० मिनिटे (एकूण २० मिनिटांचा) विलंब क्षमापित करून परीक्षार्थ्याला परीक्षेस प्रविष्ठ करून घेता येईल अशा सूचना राज्य मंडळाकडून देण्यात आलेल्या आहेत.

तथापि, या सवलतीचा लाभ घेवून लेखी परीक्षेस उशिरा प्रविष्ठ होणा-या विद्यार्थ्यांच्या मोबाईलमध्ये गैरमार्गाने प्रसारीत झालेला प्रश्नपत्रिकेतील आशय असल्याचे निदर्शनास आले आहे. सदर बाब अतिशय गंभीर असल्याने अशा प्रकरणांमध्ये संबंधीतांविरूध्द गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. तथापि, या गैरप्रकारांना प्रतिबंध करण्यासाठी लेखी परीक्षेस उशिराने प्रविष्ठ होवू देण्याची सवलत दि. १६/०३/२०२२ पासून बंद करण्यात येत आहे. तसेच याबाबत पुढीलप्रमाणे कार्यवाही करण्याच्या सूचना संबंधीतांना देण्यात आलेल्या आहेत.

१. सर्व संबंधीत विद्यार्थ्यांनी परीक्षा सुरू होण्यापूर्वी किमान एक तास अगोदर परीक्षा केंद्रावर हजर राहणे आवश्यक आहे.

२. विद्यार्थ्यांना परीक्षा सुरू होण्यापूर्वी १० मिनिटे अगोदर (प्रश्नपत्रिका वाटप करण्याच्या वेळेपर्यंत) म्हणजेच सकाळच्या सत्रामध्ये स. १०.२० पर्यंत आणि दुपारच्या सत्रामध्ये दु. २.५० पर्यंत परीक्षा कक्षामध्ये हजर राहणे बंधनकारक राहील.

३. विद्यार्थी अपरिहार्य कारणामुळे परीक्षा केंद्रावर परीक्षा सुरू होतेवेळी म्हणजेच सकाळच्या सत्रामध्ये स. १०.३० वा. व दुपारच्या सत्रामध्ये दु. ३.०० वा. पर्यंत आल्यास त्याचे शैक्षणिक नुकसान होवू नये यासाठी त्यांची तपासणी करून विद्यार्थ्यास विभागीय मंडळाच्या मान्यतेने परीक्षेस बसण्यास परवानगी देण्यात यावी.

४. परीक्षा सुरू झाल्यानंतर म्हणजेच सकाळच्या सत्रामध्ये स. १०.३० नंतर व दुपार सत्रामध्ये दु. ३.०० नंतर कोणत्याही परिस्थितीत विद्यार्थ्यांना परीक्षा कक्षामध्ये प्रवेश देण्यात येवू नये.

सर्व मा. विभागीय आयुक्त व मा. जिल्हाधिकारी यांना जास्तीत जास्त दक्षता पथके कार्यान्वीत करून परीक्षा केंद्र/उपकेंद्रांना वारंवार भेटी देवून परीक्षा काळात होणा-या गैरप्रकारांना प्रतिबंध करण्यासाठी शासन स्तरावरून निर्देश देण्यात आले आहेत.

परीक्षा केंद्रात मोबाईल व अन्य तत्सम साधने बाळगण्यास व वापरण्यास प्रतिबंध करण्यात आलेला आहे. याची परीक्षार्थी व सर्व संबंधीत घटकांनी पुनःश्च नोंद घ्यावी.

उपरोक्तप्रमाणे सर्व प्राचार्य, मुख्याध्यापक, विद्यार्थी, शिक्षक, पालक व इतर संबंधीत घटकांनी नोंद घ्यावी.

(डॉ. अशोक भोसले)
सचिव,
राज्य मंडळ, पुणे ४.

दि. १५/०३/२०२२